# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

**परीपत्रक क्रमांक – ६०**

ज़ा.क्र. झोपुप्रा/मुकाअ/परिपत्रक/२००४
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.
दिनांक – ०१.०१.२००४

## परिपत्रक

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाअंतर्गत झोपडपट्टी पुनर्वविकासाचे अनेक प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या प्रकल्पाशी संबंधित कामाचे गुणवत्तेबाबत तक्रारी प्राधिकरणास प्राप्त होत आहेत. प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेला तांत्रिक कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने या तक्रारींकडे लक्ष देण्यास विलंब होतो. परीणामी योग्यवेळी तक्रारींचे निराकरण न झाल्याने संबंधित प्रकल्पाचे लाभार्थी / तक्रारदार यांचे मनामध्ये गोंधळ निर्माण होऊन प्राधिकरणाची प्रतिमा मलिन होते. सदर बाबींवर विचार करून वरील तक्रारींची योग्य वेळी सोडवणूक करण्यासाठी गुणवत्ता नियंत्रण कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

सदर गुणवत्ता नियंत्रण कक्षाचे प्रमुख म्हणून कार्यकारी अभियंता (गुणवत्ता नियंत्रण कक्ष) हे काम पाहतील त्यांचे मदतीस पुरेसा कर्मचारी वर्ग वेळोवेळी देण्यात येईल. सदरील गुणवत्ता नियंत्रण कक्षामार्फत दरमहा कार्यान्वित प्रकल्पांना भेटी देऊन गुणवत्ता विषयक बाबींची तपासणी करून व्यापक अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करतील.

कार्यकारी अभियंता (गुणवत्ता नियंत्रण कक्ष ) हे आपल्या अहवालात कारवाईयोग्य शिफारशी बाबत सुस्पष्टपणे सूचना/दुरूस्ती सुचवतील.

सदरील आदेश हे दिनांक ०१.०१.२००४ पासून अमलात येतील.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

A:\Paripatrak.doc